30 SEP 2022 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रीय सेवा योजनेचे सुसंस्कार आयुष्यभर जपा

**कोल्हापूर :** राज्यभरातील विद्यापीठांमध्ये ३ लाख ५४ हजार राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आहेत. त्यातून मोजक्या ३८० स्वयंसेवकांची राष्ट्रीय व राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन निवड शिबिरासाठी सहभागी केले आहे. सुसंस्कार आयुष्यभर जपण्यावर स्वयंसेवकांनी भर द्यावा, असे आवाहन भारत सरकारच्या युवा कार्य व क्रीडा मंत्रालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे क्षेत्रीय संचालक डी. कार्तिकियन यांनी केले.

केंद्र सरकार राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेच्या तीन दिवसीय राष्ट्रीय/ राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन निवड चाचणी शिबिराचे उद्घाटन झाले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते.

प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, एनएसएसच्या संस्कारातून जल व हरित संवर्धनासाठी योगदान देऊ शकलो. त्यामुळे स्वयंसेवकांनीही प्रत्येक उपक्रमात कृतीशीपणे सहभागी व्हावे. अध्यक्षस्थानावरूत प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, एनएसएसच्या प्रत्येक स्वयंसेवक आपापल्या विद्यापीठाचा सदिच्छादूत आहे. त्यांनी सदिच्छेचे व मानवतेचे मूल्य आपल्यासोबत सदैव बाळगावे. कोरोना व महापुरात शिवाजी विद्यापीठाच्या स्वयंसेवकांनी नागरिकांना समुपदेशनासह विविध प्रकारे मदत केली. स्वयंसेवकांनी ही सामाजिक बांधिलकी आयुष्यभर जपावी.

महासत्ता

# शिवाजी विद्यापीठात पथसंचलन निवड चाचणी शिबीर

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)-

..................................

शिवाजी विद्यापीठात ३० सप्टेंबरपर्यंत तीन दिवसीय राष्ट्रीय, राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन निवड चाचणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून सन २०२२-२३ या वर्षासाठी ही निवड चाचणी आहे.

या शिबिरात राष्ट्रीय/राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथ संचलनाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांची परेड, वजन, उंची, मुलाखत, इत्यादींच्या माध्यमातून निवड प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. तसेच सायंकाळच्या सत्रात सहभागी विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रमही होणार आहे. या निवड चाचणी शिबिराच्या माध्यमातून ३१२ विद्यार्थ्यांमधून ५६ विद्यार्थी पश्चिम विभागीय (वेस्ट झोन) संचलनासाठी, १४ विद्यार्थी राष्ट्रीय पथसंचलनासाठी एनआरटी निवडले जाणार आहेत आणि उर्वरित ४२ विद्यार्थ्यांमध्ये आणखी ३८ विद्यार्थ्यांची निवड करून एकूण ८० विद्यार्थी राज्यस्तरीय पथसंचलनासाठी एसआरडी निवडले जातील.

30 SEP 2022 तरूण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत एनएसएसचे व्यक्तिमत्त्वपूर्ण योगदान



कसबा बावडा : डी. वाय. पाटील अभियांत्रिकीमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. व्ही. एन. शिंदे.

वार्ताहर
कसबा बावडा

राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) राष्ट्रीय एकात्मतेचे सशक्त साधन आहे. विद्यार्थ्यांच्या जडण-घडण व व्यक्तिमत्त्व विकासात एनएसएसचे मोठे योगदान आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजित 'राष्ट्रीय सेवा योजना दिन' कार्यक्रमात ते बोलत होते.

ते म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांच्या मानता राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लागते. सामजिक जाणीव अधिक समृद्ध होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व आणि त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आयुष्यात होणारे बदल याविषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. संतोष चेडे यांनी केले. अधिष्ठाता डॉ. राजेंद्र रायकर यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. राहुल पाटील, डॉ. नवनीत सांगले, प्रा. संकेत शिंदे यांच्याबरोबर राष्ट्रीय सेवा योजनेचे सुमारे

- **डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रतिपादन**
- **डी. वाय. पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे कार्यक्रम**

१८५ स्वयंसेवक उपस्थित होते. संकेत चौगले, सौरभ केसरकर, वैभव नगने, धनश्री बोडेकर, पूनम पाटील, अक्षता कवठेकर या स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष माजी गृहराज्यमंत्री सतेज डी. पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण, ऑनलाईन शिक्षण केंद्र सुट्टीदिवशी सुरू राहणार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. सुट्टीच्या दिवशीसुद्धा कार्यालय सुरू राहणार असल्याची माहिती उपकुलसचिव डॉ. एन.जे. बनसोडे यांनी दिली.

विद्यार्थ्यांसाठी केंद्राच्या मुख्य कार्यालयात मोफत बी.ए., बी.कॉम, एम.ए., (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम, एम.एस्सी. (गणित) अभ्यासक्रमांचे प्रवेश अर्ज भरून देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे प्रवेश प्रक्रिया सुरू असेपर्यंत दुसरा व चौथा शनिवार व रविवार आणि शासकीय सुट्टी असलेल्या दिवशीसुद्धा कार्यालय सुरू राहणार आहे. विद्यार्थी, गृहिणी, कामगार, शेतकरी, उद्योजक, सैनिक यांना दूरशिक्षणाची संधी आहे. त्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संचालक प्रा.डॉ.डी.के.मोरे यांनी केले आहे.

पुढारी

# विद्यापीठाकडून आजअखेर ५३२ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्र परीक्षेंतर्गत आजअखेर सुमारे ५३२ परीक्षांचे निकाल घोषित झाले आहेत. विद्यापीठातर्फे ७४७ अभ्यासक्रमांपैकी विद्यापीठस्तरावरील ५६१ परीक्षा एमसीक्यू ऑफलाईन पद्धतीने झाल्या आहेत. दि. २९ रोजी चार अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले.

पुण्यनगरी

# दूरशिक्षण, ऑनलाईन केंद्र सुट्टी दिवशीही सुरु

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राचे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे सुट्टी असलेल्या दिवशीही कार्यालय सुरू राहणार असल्याची माहिती उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे, संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी दिली. विद्यार्थ्यांसाठी केंद्राच्या मुख्य कार्यालयात मोफत बी.ए., बी. कॉम., एम.ए., (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) या अभ्यासक्रमासाठी प्रवेश अर्ज भरून देण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे प्रवेश प्रक्रिया सुरू असेपर्यंत दुसरा व चौथा शनिवार, तसेच रविवार आणि शासकीय सुट्टीदिवशी कार्यालय सुरू राहणार आहे.

तरुण भारत

# दूरशिक्षण सुट्टीदिवशीही सुरु राहणार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राचे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीची प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. त्यामुळे सुट्टी दिवशीही कार्यालय सुरु राहणार आहे, तरी विद्यार्थ्यांनी यांची नोंद घ्यावी, असे आवाहन संचालक डॉ. डी. के. मोरे व उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे यांनी केले आहे. विद्यार्थ्यांसाठी केंद्राच्या मुख्य कार्यालयात मोफत बी. ए., बी. कॉम, एम. ए., (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम. कॉम, एम. एस्सी. (गणित) या अभ्यासक्रमाची प्रवेश अर्ज भरण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे प्रवेश प्रक्रिया सुरु असेपर्यंत दुसरा व चौथा शनिवार तसेच रविवार आणि शासकीय सुट्टी असलेल्या दिवशीसुद्धा कार्यालय सुरु राहणार आहे. विद्यार्थी, गृहिणी, कामगार, शेतकरी, उद्योजक, सैनिक थदींनी प्रवेश निश्चित करावा.